क्र.कावि/कक्ष७:२/प्रअभूसं/न.क्र.३९ /कावि-२७२८/२०१९

जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा

दिनांक- १६/०८/२०१९

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक २१/२००८-०९ मोजे हिंगण दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा येथील (बुडीत क्षेत्र)येथील क्षेत्रामधील (शेतीसाठी) संपादीत होणा-या जमिनीच्या कलम १९ च्या अधिसुचनेस मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ:- :- विशेष भूसंपादन अधिकारी क्र.क्र.३ जिगांव प्रकल्प बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/ अका/क्र.३/१३६/२०१९ दिनांक ७/८/२०१९.

*****

ज्या अर्थी विशेष भूसंपादन अधिकारी क्र.क्र.३ जिगांव प्रकल्प बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रान्वये भूसंपादन प्रकरण क्रमांक २१/२००८-०९ मोजे हिंगण दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत क्षेत्र)येथील क्षेत्रामधील (शेतीसाठी) संपादीत होणा-या जमिनीच्या कलम १९ च्या अधिसुचनेस मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणात भूमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदी नुसार समुचित शासनाचे मते जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तीत्वात असेल तर १२ (बारा) महिने मुदतवाढ घेण्याची तरतुद आहे. सदर प्रकरणात पुर्वी सहा महिन्याची मुदतवाढ घेण्यांत आलेली असल्यामुळे व निधी अभावी प्रकरणात कलम १९ ची कार्यवाही करणे शक्य नसल्यामुळे सदर प्रकरणामध्ये पुन्हा ६ (सहा) महिन्याची मदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम १९(७) नुसार जेव्हा प्राथमिक सुचनेच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत पोट कलम १ मध्ये कोणती ही घोषणा प्रसिध्दी केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु या पोट कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजतांना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेल्या कोणत्याही स्थगितीमुळे किंवा मनाई हूकूमामुळे जमीन संपादनाची कार्यवाही ज्या कालावधीसाठी थांबलेली होती असा कोणताही कालावधी वगळण्यात येईल किवा असे कोणताही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु आणखी असे समुचित शासनाच्या मते जर कालावधी काढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्याचा कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतुद आहे.

त्याअर्थि भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम १९(७) नुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक २१/२००८-०९ मोजे हिंगण दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा बुडीत क्षेत्रामधील (शेतीसाठी) या प्रकरणात कलम १९ (१) ची अधिसुचना घोषीत करण्यास ६ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

(डॉ.निरुपमा डांगे)
जिल्हाधिकारी बुलडाणा

विशेष भूसंपादन अधिकारी (क्र. ३)
जिगांव प्रकल्प, बुलडाणा.